# चैनचोरी व फसवणुक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी

1. महीलांनी दागिन्यांचे प्रदर्शन न करता घातलेले दागिने ओढणीखाली अगर पदराखाली सुरक्षित ठेवा.
2. मोटारसायकलवरुन येवून दागिने खेचणाऱ्या चोरांपासून सावध रहा. असे संशयीत शक्यतो पल्सरसारखी वेगाने धावणारी मोटारसायकल वापरतात. त्यावर असलेले दोन्ही इसम काही प्रसंगी हेल्मेटचा वापर करतात, हे लक्षात ठेवा.
3. चालताना फुटपाथचा वापर करा, जेणेकरून मोटार सायकलस्वारास दागिने हिसकावण्यासाठी आपल्यापर्यंत पोहोचता येणार नाही.
4. पितळी भांडी चमकवुन देतो असे सांगुन नंतर दागिन्यांनाही पॉलिश करुन देतो असा बहाणा करून चोरटे हातचलाखीने दागिने लांबवितात, यासाठी दागिने पॉलिशचा मोह टाळा.
5. वयस्कर इसम अगर वृद्ध महिला रस्त्यावरून जात असताना, आम्ही पोलीस आहोत, पुढे मोठा अपघात अथवा खून झाला आहे अषी खोटी माहिती सांगून, पोलीस तपासणी चालु असल्याने तुमचे दागिने काढून पिशवीत अथवा रूमालात ठेवा असे सांगतात व पुढे हात चलाखीने ते दागिने लंपास करतात. असे इसम प्रसंगी पोलीस असल्याबाबतचे बनावट/खोटे ओळखपत्र देखील दाखवतात. असे संशयित इसम आढळल्यास आजुबाजुच्या लोकांना बोलवा. खरे पोलीस केव्हाही दागिने काढुन ठेवण्याबाबत सांगत नाहीत, हे नेहमी लक्षात ठेवा.